# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.11.2024** **वार – शनिवार**

---

**बलिप्रतिपदा**

कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात बलिप्रतिपदेला व्यापारी वर्गाचं आज नवीन वर्ष सुरू होत आहे. व्यापाऱ्यांनी पहाटे शुभमुहूर्तावर चोपडी अर्थात वहीपूजन केलं. दिवाळी पाडव्यानिमित्त पत्नी पतीचं औक्षण करते आणि पतीकडून पत्नीला भेटवस्तू स्वरूपात ओवाळणी देण्यात येते. त्यामुळे सराफी पेढ्यांवरही सकाळपासून दागिने खरेदीसाठी नागरिकांनी दिवाळी पाडव्याचा मुहूर्त साधला. अन्नकोटाव्दारे देवांना विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवण्यासही सुरूवात झाली आहे.

**दिव्यांग**

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 12 हजार 101 दिव्यांग मतदार चिंचवड विधानसभा मतदार संघात तर सर्वात कमी म्हणजेच 1 हजार 689 दिव्यांग मतदार मावळ मतदार संघात आहेत, दिव्यांग मतदारांसाठी सर्व मतदार संघात विविध सोयी उपलब्ध करुन देण्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सुहास दिवसे यांनी दिली आहे. जिल्ह्यात 21 विधानसभा मतदार संघात मिळून 90 हजार 134 दिव्यांग मतदार आहेत.

**खर्च-वेळापत्रक**

चिंचवड तसंच वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचं दैनंदिन खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. या वेळापत्रकानुसार उमेदवारांच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची तपासणी खर्च निरिक्षकांमार्फत करण्यात येणार आहे. उमेदवारानं दररोज केलेल्या खर्चाचा तपशील, बँक पासबुक आणि सर्व देयकांच्या मूळ पावत्यांसह विहित वेळेत खर्चाचा तपशील तपासणीसाठी सादर करावा, असं संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**निवडणूक**

पुणे जिल्ह्यात ज्या ठिकाणी भाजपचे उमेदवार आहेत अशा अनेक ठिकाणी अजित पवार गटानं आपले उमेदवार उभे केले असले तरी हे उमेदवार माघार घेतील अशी अपेक्षा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केली. पक्षातील कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर फडणवीस पत्रकारांशी बोलत होते.

**शपवार**

केंद्र सरकारच्या अर्थ विभागाच्या मंत्रालयानं केलेल्या गुणांकनामध्ये महाराष्ट्र पहिल्या पाचमध्ये नाही, याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली. ते आज बारामती इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. विधानसभा निवडणूक संपल्यानंतर लोकप्रिय योजनांचं काय होणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**निवडणूक**

लाडक्या बहिणींना फुकटचे दीड हजार नको आहेत, तर त्यांच्या हाताला काम आणि सुरक्षित वातावरण अधिक महत्वाचं आहे, असं मत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी पुण्यात व्यक्त केलं. 'एकी हेच बळ' समजून काँग्रेस कार्यकर्त्यांनी निवडणुकीला सामोरं जाण्याचं ठरवलं असल्याचंही सुरवसे-पाटील म्हणाले.

**आंबेडकर**

वंचित बहुजन आघाडीचे आमदार निवडून आले, तर आरक्षणावरील हल्ला थांबवता येईल, असं वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज पुण्यात सांगितलं. एससी, एसटी, ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी ही अस्तित्वाची लढाई आहे असंही ते म्हणाले.

**अंगणवाडी**

अहिल्यानगर जिल्ह्यात अत्याचाराला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकेच्या खून प्रकरणी आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, तसंच अंगणवाडी शिक्षिका, मदतनीसांना सुरक्षिततेची भाऊबीज ओवाळणी द्यावी, अशी मागणी अंगणवाडी कर्मचारी सभेनं पुण्यात केली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करुन सुरक्षिततेची भाऊबीज ओवाळणी मागण्याचा निर्धार अंगणवाडी सेविकांनी केला आहे अशी माहिती अंगणवाडी कर्मचारी सभेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी दिली.

**मुक्ताबाई**

संत मुक्ताबाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा ब्रह्मचित्कला मुक्ताई हा आगळा कार्यक्रम आज पुण्यात सादर झाला. महाराष्ट्रातल्या संतांच्या कार्याची माहिती आणि महती सांगणाऱ्या मालिकेअंतर्गत हा पहिला कार्यक्रम आज दिवाळीच्या निमित्तानं सादर झाला. याची निर्मिती आणि संगीत दिग्दर्शन पंडित हेमंत पेंडसे यांचं होतं तर ह.भ.प रोहिणी माने - परांजपे यांनी निरूपण केलं.

**नेमबाजी**

पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात 12 ते 16 नोव्हेंबर दरम्यान दिव्यांगांच्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा रंगणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील अंदाजे 600 नेमबाज सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा दहा मीटर रायफल, 25 मीटर एअर पिस्टल ,50 मीटर एअर पिस्टल, 50 मीटर रायफल या प्रकारात होणार आहे. केंद्रीय क्रिडा मंत्रालयाच्या वतीनं दिव्यांगांसाठी नेमबाजीसाठी आवश्यक विशेष रेंज आणि पिस्टलची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**बांधकाम**

राज्यात भारतातील सर्वाधिक हरित-प्रमाणित प्रकल्प आहेत. यामध्ये 1 हजार 94 हरित इमारती आहेत. त्यापैकी अनेक इमारती पुण्यात आहेत. पुण्यातील बांधकाम उद्योगाला गेल्या काही वर्षांत अनियमिततेच्या आव्हानांचा सामना करावा लागला आहे. परंतु, गेल्या दशकात शाश्वत आणि जबाबदार बांधकामाच्या दिशेनं काही आश्वासक बदल वेगानं होत आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. उद्याही हवामान असंच राहून कमाल तापमान 34 अंश तर किमान तापमान 19 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. आठ नोव्हेंबरपर्यंत तरी थंडीची चाहूल लागणार नाही अशी चिन्हं दिसत आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**